मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दिनांक २७ डिसेंबर २०२३ । पान १

# विकेंडसह थर्टीफस्टची तयारी जोरात

## नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन देखील तयार

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
या विकेंडला इयर एंडिंग देखील आहे. त्यामुळे नाचगाणे, मजा मस्ती, धमाल करण्यासाठी अनेकांचे प्लॅन सुरु झाले आहेत. डीजेच्या दणदणाटात सरत्या वर्षाला निरोप देऊन नवीन वर्षाचे स्वागत करण्याची तयारी सुरु आहे.यासाठी हॉटेल, रेसॉर्ट, पार्टी हॉल, लॉन, रुफटॉप आदिंचे बुकिंग जोरात सुरु आहे. दरम्यान, या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून देखील काही खबरदारी घेतली जात आहे. पिंपरी-चिंचवड शहरालगत हिंजवडी, तळवडे येथे मोठ्या प्रमाणात आयटी कंपन्या आहेत. या कंपन्यांना शनिवार आणि रविवार अशी दोन दिवस सुट्टी असते. त्यात यावर्षीचा इयर एंड रविवारी होत आहे. त्यामुळे आयटीयंस जरा जास्तच



खुश आहेत. सर्वच स्तरातील लोकांना नवीन वर्षाचे वेध लागलेले असतात. पण त्यात आयटीयंसचा उत्साह थोड्याफार प्रमाणात अधिकच असतो. याच आयटीयंसच्या आवडी निवडी समोरठेऊन अनेक हॉटेल मालकांनी ३१ डिसेंबरच्या पार्ट्यांचे जंगी नियोजन केले आहे. आगाऊ बुकिंगद्वारे विविध पॅकेजेस दिले जात आहेत. रविवार आणि ३१ डिसेंबर हा दुहेरी योग जुळून आल्याने अनेकांच्या आनंदाला पारावार उरलेला नाही. याच पार्श्वभूमीवर शहरासह आजूबाजूच्या परिसरातील हॉटेल्स देखील आगाऊ बुकिंग घेऊ लागली आहेत. शनिवार आणि रविवार मावळ, मुळशी मधील परिसर पर्यटकांच्या गर्दीने फुलून जाणार आहे. दिवसभर पर्यटन स्थळी भटकंती करून रात्रीच्या वेळी मस्त एन्जॉय करण्याचा मूड प्रत्येकजण बनवत आहे. नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन देखील तयार झाले आहे. यावर्षीचा इयर एंड रविवारी होत आहे. सर्वच स्तरातील लोकांना नवीन वर्षाचे वेध लागलेले असतात. पण त्यात आयटीयंसचा उत्साह थोड्याफार प्रमाणात अधिकच असतो. याच आयटीयंसच्या आवडी निवडी समोरठेऊन अनेक हॉटेल मालकांनी ३१ डिसेंबरच्या पार्ट्यांचे जंगी नियोजन केले आहे. आगाऊ बुकिंगद्वारे विविध पॅकेजेस दिले जात आहेत. रविवार आणि ३१ डिसेंबर हा दुहेरी योग जुळून आल्याने अनेकांच्या आनंदाला पारावार उरलेला नाही. नवीन वर्षाच्या स्वागताच्या आनंदावर कुठेही विरजण पडू नये यासाठी पोलिसांकडून पुरेशी खबरदारी घेतली जात आहे. हॉटेल चालकांना वेगवेगळे परवाने देताना अनेक बाबींची पडताळणी केली जात आहे. प्रत्येक ग्राहकाला सुरक्षितपणे घरी पोहोचविण्याची लेखी हमी हॉटेल चालकांकडून घेतली जात आहे. मद्य प्राशन करून वाहने चालवू नये, असे आवाहन पोलिसांकडून केले आहे. त्या दृष्टीने पोलीस ३१ डिसेंबर रोजी रात्रभर नाकेबंदी लावणार असून गस्त देखील वाढवणार आहेत.

### आयटीयंसचा उत्साह थोड्याफार प्रमाणात अधिकच

» तळवडे येथे मोठ्या प्रमाणात आयटी कंपन्या आहेत. या कंपन्यांना शनिवार आणि रविवार अशी दोन दिवस सुट्टी असते. त्यात यावर्षीचा इयर एंड रविवारी होत आहे. त्यामुळे आयटीयंस जरा जास्तच खुश आहेत. सर्वच स्तरातील लोकांना नवीन वर्षाचे वेध लागलेले असतात. पण त्यात आयटीयंसचा उत्साह थोड्याफार प्रमाणात अधिकच असतो. याच आयटीयंसच्या आवडी निवडी समोरठेऊन अनेक हॉटेल मालकांनी ३१ डिसेंबरच्या पार्ट्यांचे जंगी नियोजन केले आहे. आगाऊ बुकिंगद्वारे विविध पॅकेजेस दिले जात आहेत. रविवार आणि ३१ डिसेंबर हा दुहेरी योग जुळून आल्याने अनेकांच्या आनंदाला पारावार उरलेला नाही. याच पार्श्वभूमीवर शहरासह आजूबाजूच्या परिसरातील हॉटेल्स देखील आगाऊ बुकिंग घेऊ लागली आहेत.

# पिंपरी- चिंचवडमध्ये 'स्पा'च्या नावाखाली वेश्याव्यवसाय

## पोलिसांनी टाकला छापा, दोन तरुणींची सुटका

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
निगडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत 'स्पा'च्या नावाखाली वेश्याव्यवसाय करणाऱ्या 'स्पा' मालकासह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये एका महिलेचा समावेश आहे. दोन पीडित तरुणींची सुटका करण्यात पिंपरी-चिंचवडच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध विभागाला यश आले आहे. याप्रकरणी राकेश शिंदे (स्पा मॅनेजर), अक्षय बनकर (स्पा मालक) आणि आणखी एका महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिंपरी- चिंचवड मधील निगडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत 'ब्ल्यू-स्टोन स्पा' या नावाने स्पा सुरू होता. त्या ठिकाणी तरुणींना पैशांचे आमिष



दाखवून वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले जात होते. याबाबतची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधकचे पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण यांना मिळाली. 'ब्ल्यू स्टोन स्पा' मध्ये डमी ग्राहक पाठवून खरंच त्या ठिकाणी वेश्याव्यवसाय चालतो का? याबाबतची खात्री चव्हाण यांनी करून त्या ठिकाणी छापा टाकला. यामध्ये दोन पीडित तरुणींची सुटका करण्यात पोलिसांना यश आले असून स्पा मालकासह तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेप्रकरणी निगडी पोलीस ठाण्यात अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निगडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत 'स्पा'च्या नावाखाली वेश्याव्यवसाय करणाऱ्या 'स्पा' मालकासह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये एका महिलेचा समावेश आहे. दोन पीडित तरुणींची सुटका करण्यात पिंपरी-चिंचवडच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध विभागाला यश आले आहे.

# काही जणांना खासदार व्हायचंय!

## अजित पवार संजोग वाघेरेंची नाराजी दूर करणार?

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवड हा अजित पवारांचा बालेकिल्ला आहे, असं नेहमीच म्हटलं जातं. मात्र याच बालेकिल्ल्यातून आता अजित पवारांना एक- एक धक्का बसत असल्याचं समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी शहराध्यक्ष तथा माजी महापौर संजोग वाघेरे हे शिवसेना ठाकरे गटाच्या वाटेवर आहेत. त्यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आणि तसा इशारा दिला आहे. याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रतिक्रिया समोर आली असून महाविकास आघाडीला उमेदवार मिळत नसल्याने ते अशा प्रकारे वेगवेगळ्या पक्षातील उमेदवार घेत असल्याचा टोला त्यांनी उद्धव ठाकरे गटाला लगावला आहे. याबाबत मी संजोग वाघेरे सोबत लवकर चर्चा करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. कुठल्या पक्षात जायचे आणि कुठल्या पक्षात थांबायचे यासाठी व्यक्ती आणि मत स्वातंत्र्य असल्याचे देखील अजित पवारांनी म्हटले आहे. ते सोमवारी पिंपरी- चिंचवडमध्ये बोलत होते. अजित पवार म्हणाले, राजकारणात कोण कोणाच्या भेटी घेतो हे राजकारणात पहिल्यापासूनच आहे. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप या पक्षातून उमेदवारी कोणाला मिळेल याची चाचपणी एखाद्याने केली असेल. काही जणांना खासदार व्हायचं आहे. या पक्षात तिकीट नाही मिळालं तर त्या पक्षात तिकीट मिळेल का? या हेतूने काही जण गेले असतील. माझं त्यांच्यासोबत काही संभाषण झालेलं नाही. संजोग वाघेरे आणि उद्धव ठाकरे यांचा फोटो मी एकत्र बघितलेला आहे. संजोग वाघेरे सोबत याबाबत मी चर्चा करणार आहे. प्रत्येकाला व्यक्ती आणि मत स्वातंत्र्य आहे. महाविकास आघाडीला उमेदवार मिळत नसल्याने ते आता अशा प्रकारे वेगवेगळ्या पक्षातील उमेदवार घेत आहेत. असा टोला अजित पवारांनी ठाकरे गटाला लगावला आहे. याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रतिक्रिया समोर आली असून महाविकास आघाडीला उमेदवार मिळत नसल्याने ते अशा प्रकारे वेगवेगळ्या पक्षातील उमेदवार घेत असल्याचा टोला त्यांनी उद्धव ठाकरे गटाला लगावला आहे.





### संजोग वाघेरे सोबत याबाबत मी चर्चा करणार

» कुठल्या पक्षात जायचे आणि कुठल्या पक्षात थांबायचे यासाठी व्यक्ती आणि मत स्वातंत्र्य असल्याचे देखील अजित पवारांनी म्हटले आहे. ते सोमवारी पिंपरी- चिंचवडमध्ये बोलत होते. अजित पवार म्हणाले, राजकारणात कोण कोणाच्या भेटी घेतो हे राजकारणात पहिल्यापासूनच आहे. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप या पक्षातून उमेदवारी कोणाला मिळेल याची चाचपणी एखाद्याने केली असेल. काही जणांना खासदार व्हायचं आहे. या पक्षात तिकीट नाही मिळालं तर त्या पक्षात तिकीट मिळेल का? या हेतूने काही जण गेले असतील. माझं त्यांच्यासोबत काही संभाषण झालेलं नाही. संजोग वाघेरे आणि उद्धव ठाकरे यांचा फोटो मी एकत्र बघितलेला आहे. संजोग वाघेरे सोबत याबाबत मी चर्चा करणार आहे.

# कामशेत येथे १ जानेवारीपासून कीर्तन महोत्सव

## आमदार सुनिल शेळके यांच्या वतीने नवीन वर्षात कीर्तन महोत्सवाचे आयोजन

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** श्री विठ्ठल परिवार मावळ व आमदार सुनिल शेळके यांच्या वतीने नवीन वर्षात कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कामशेत येथे सोमवार १ जानेवारी २०२४ पासून कीर्तन महोत्सव सुरु होणार असल्याची माहिती कीर्तन महोत्सव समिती अध्यक्ष दिलीप महाराज खेंगरे, श्री विठ्ठल परिवार अध्यक्ष गणेश महाराज जांभळे, विठ्ठल नाम जप समिती प्रमुख नितीन महाराज काकडे आदींनी दिली.

आमदार सुनिल शेळके यांच्या माध्यमातून मावळ तालुक्यातील सर्वात मोठ्या कीर्तन महोत्सवाचे दरवर्षी आयोजन केले जाते. किर्तन महोत्सवाचे यंदा सहावे वर्ष असून कामशेत येथे साजऱ्या होणाऱ्या भव्य कीर्तन महोत्सवात यावर्षीही महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकारांची दररोज सायंकाळी सहा वाजता सुश्राव्य कीर्तने होणार आहेत. मावळातील कानाकोपऱ्यातून विशेषत: ग्रामीण भागातून भाविक मोठ्या संख्येने या ठिकाणी उपस्थित राहत असतात.या कार्यक्रमासाठी कामशेत येथील मैदानात भव्य मंडप पार्कींग व्यवस्थेसह उभारण्यात आला आहे. सोमवार १ जानेवारीला एकनाथ महाराज चत्तर, मंगळवार २ जानेवारीला विशाल महाराज खोले, बुधवार ३ जानेवारीला बाळू महाराज गिरगावकर, गुरुवार ४ जानेवारीला योगीराज महाराज गोसावी तसेच कार्यक्रमाच्या अखेरच्या दिवशी शुक्रवार ५ जानेवारीला अक्रूर महाराज साखरे यांचे सकाळी दहा ते बारा यावेळेत काल्याचे किर्तन संपन्न होणार आहे. कामशेत येथे सोमवार १ जानेवारी २०२४ पासून कीर्तन महोत्सव सुरु होणार असल्याची माहिती कीर्तन महोत्सव समिती अध्यक्ष दिलीप महाराज खेंगरे, श्री विठ्ठल परिवार अध्यक्ष गणेश महाराज जांभळे, विठ्ठल नाम जप समिती प्रमुख नितीन महाराज काकडे आदींनी दिली.

आमदार सुनिल शेळके यांच्या माध्यमातून मावळ तालुक्यातील सर्वात मोठ्या कीर्तन महोत्सवाचे दरवर्षी आयोजन केले जाते. या कार्यक्रमात सहभागी होऊन किर्तन श्रवणाचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे. श्री विठ्ठल परिवार मावळ व आमदार सुनिल शेळके यांच्या वतीने नवीन वर्षात कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कामशेत येथे सोमवार १ जानेवारी २०२४ पासून कीर्तन महोत्सव सुरु होणार असल्याची माहिती कीर्तन महोत्सव समिती अध्यक्ष दिलीप महाराज खेंगरे, श्री विठ्ठल परिवार अध्यक्ष गणेश महाराज जांभळे, विठ्ठल नाम जप समिती प्रमुख नितीन महाराज काकडे आदींनी दिली.



# पाणीपट्टी थकवणाऱ्यांचे पाणी बंद!

## थकबाकीबाबत पालिकेकडून कडक पावले उचलली जाणार



**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शासकीय संस्थांकडे असलेल्या पाणीपट्टीच्या थकबाकीबाबत महापालिकेकडून कडक पावले उचलली जाणार आहेत. थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी संबधित संस्थांना नोटीस बजावण्यात येणार असून, ३१ जानेवारीपर्यंत थकबाकीची रक्कम न भरल्यास त्यांचा पाणीपुरवठा बंद करण्याचा आदेश महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी दिला. शहरात केंद्र, राज्य सरकारच्या अनेक कार्यालयांसह रेल्वेसह पुणे आणि खडकी कटक मंडळे आहेत. त्यांना महापालिकेकडून पाणीपुरवठा केला जातो. मात्र या सर्व विभागांकडे मोठ्या प्रमाणावर पाणीपट्टी थकली आहे. थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी महापालिकेकडून सातत्याने प्रयत्न करण्यात येतात. मात्र त्याला प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे थकबाकीदार संस्थांना पुन्हा एकदा नोटीस बजावून थकबाकीची रक्कम भरण्यासाठी ३१ जानेवारीपर्यंतची मुदत दिली जाणार आहे. नोटीस बजावूनही थकबाकीची रक्कम न भरल्यास त्यांचा पाणीपुरवठा खंडित करण्यात येणार असल्याचे विक्रम कुमार यांनी सांगितले. महापालिकेने शासकीय संस्थांची थकबाकी वसूल करण्यासाठी गेल्यावर्षीही विशेष मोहीम राबवली होती. शासकीय संस्थांपैकी एकट्या पुणे कटक मंडळाकडे ४० कोटी रुपयांची थकबाकी आहे. त्यामुळे कटक मंडळाचा पाणीपुरवठा गेल्यावर्षी बंद करण्यात आल्यावर कटक मंडळाने तातडीने दोन कोटी रुपयांची रक्कम भरली. मात्र त्यानंतर उर्वरित रक्कम भरण्यात आलेली नाही. हीच परिस्थिती अन्य संस्थांबाबतही असल्याने आता अधिक कडक कार्यवाही करण्यात येणार आहे. महाराष्ट्र जलजीवन प्राधिकरणाच्या माध्यमांतून देवाची उरूळी, फुरसुंगी आणि मंतरवाडीला पाणीपुरवठा करण्यासाठी योजना करण्यात आली आहे. त्यासाठीचा निधी महापालिकेने उपलब्ध करून दिला आहे. योजनेतील जलवाहिनी, साठवण टाकी आणि जलकेंद्राचे काम झाले असले, तरी रेल्वेमार्ग ओलांडून टाकाव्या लागणाऱ्या मुख्य वाहिनीच्या कामाला परवानगी मिळत नव्हती. त्यामुळे काम रखडले होते. रेल्वेने परवानगी दिल्यानंतर जलवाहिनीचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. तसेच फुरसुंगी परिसरासाठी मुठा उजवा कालव्यातून पाणी उचलण्यात येते. त्यासाठी कालव्यात पाणी सोडावे लागत असल्याने पाण्याचा अपव्यय होतो. या पार्श्वभूमीवर लष्कर जलकेंद्रातून थेट जलवाहिनी करून फुरसुंगीला पाणीपुरवठा केला जाणार आहे. त्यासाठीच्या जलवाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. पुढील महिन्याभरात जलकेंद्रावर पंप बसवण्याचे काम पूर्ण करून देवाची उरूळी, फुरसुंगी आणि मंतरवाडीला जल वाहिनीद्वारे पाणीपुरवठा सुरू केला जाणार आहे. शहरात केंद्र, राज्य सरकारच्या अनेक कार्यालयांसह रेल्वेसह पुणे आणि खडकी कटक मंडळे आहेत. त्यांना महापालिकेकडून पाणीपुरवठा केला जातो. मात्र या सर्व विभागांकडे मोठ्या प्रमाणावर पाणीपट्टी थकली आहे. थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी महापालिकेकडून सातत्याने प्रयत्न करण्यात येतात. मात्र त्याला प्रतिसाद मिळालेला नाही.

### भरण्यासाठी ३१ जानेवारी मुदत

» थकबाकीदार संस्थांना पुन्हा एकदा नोटीस बजावून थकबाकीची रक्कम भरण्यासाठी ३१ जानेवारीपर्यंतची मुदत दिली जाणार आहे. नोटीस बजावूनही थकबाकीची रक्कम न भरल्यास त्यांचा पाणीपुरवठा खंडित करण्यात येणार असल्याचे विक्रम कुमार यांनी सांगितले. महापालिकेने शासकीय संस्थांची थकबाकी वसूल करण्यासाठी गेल्यावर्षीही विशेष मोहीम राबवली होती. शासकीय संस्थांपैकी एकट्या पुणे कटक मंडळाकडे ४० कोटी रुपयांची थकबाकी आहे.त्यामुळे कटक मंडळाचा पाणीपुरवठा गेल्यावर्षी बंद करण्यात आल्यावर कटक मंडळाने तातडीने दोन कोटी रुपयांची रक्कम भरली. मात्र त्यानंतर उर्वरित रक्कम भरण्यात आलेली नाही. महाराष्ट्र जलजीवन प्राधिकरणाच्या माध्यमांतून देवाची उरूळी, फुरसुंगी आणि मंतरवाडीला पाणीपुरवठा करण्यासाठी योजना करण्यात आली आहे.

# पुणे विद्यापीठाकडून विद्यार्थी संघटनांवर बंधने!

## विद्यार्थी कार्यक्रम, आंदोलनांसाठीची कार्यपद्धती निश्चित

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** काही दिवसांपूर्वी विविध संघटनांच्या वादातून तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर आता विद्यापीठाने विद्यार्थी संघटनांसाठी कार्यक्रम, उपक्रम, आंदोलनांसाठीची कार्यपद्धती निश्चित केली असून, विद्यार्थी संघटनांना उपक्रम, कार्यक्रमांसाठी किमान पाच दिवस आधी पूर्वपरवानगी, निश्चित केलेल्या जागेतच कार्यक्रम, उपक्रम आयोजित करण्याचे बंधन घालण्यात आले असून, विद्यापीठाचे नुकसान न होण्याबाबतचे लेखी हमीपत्रही द्यावे लागणार आहे. गेल्या महिन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विविध संघटनांमध्ये वाद होऊन हाणामारीची घटना झाली होती. त्यानंतर विद्यापीठात परस्परांच्या विरोधात मोर्चे काढण्यात आले. त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यापीठाच्या विनंतीनंतर पोलिसांनी विद्यापीठाच्या परिसरात जमावबंदी लागू केली होती. तसेच विद्यापीठ, पोलिसांनी संघटनांबरोबर बैठक घेऊन चर्चा केली. त्यात संघटनांसाठी कार्यपद्धती तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने कार्यपद्धती तयार करून त्याचा मसुदा जाहीर केला आहे. विद्यापीठाने तयार केलेल्या कार्यपद्धतीच्या मसुद्यानुसार विद्यापीठाच्या आवारात कोणतेही उपक्रम, आंदोलन, कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विद्यापीठ प्रशासन आणि पोलिसांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. पूर्वपरवानगीचा अर्ज दिला आणि त्याची पोहोच घेतली म्हणजे परवानगी दिली असे ग्राह्य धरले जाणार नाही. अर्ज ऐनवेळी किंवा उशिरा दिल्यास परवानगी दिली जाणार नाही, तरीही कार्यक्रम, उपक्रम, आंदोलन केल्यास, त्यावेळी काही अनुचित प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित संयोजकांची असेल. कोणत्याही कार्यक्रम, उपक्रमांसाठी विद्यापीठातील संविधान स्मारकाशेजारील मोकळी जागा निश्चित करून देण्याचा निर्णय विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतला आहे. पोलीस प्रशासनाकडून परवानगी मिळाल्यानंतर त्याची प्रत विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाला देणे बंधनकारक आहे. परवानगीशिवाय कार्यक्रम, उपक्रम केल्यास, नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. कार्यक्रम, उपक्रमावेळी विद्यापीठाच्या स्थावर आणि जंगम मालमत्तेचे नुकसान होणार नाही याबाबतचे लेखी हमीपत्रही द्यावे लागणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# शिरूरमध्ये अमोल कोल्हे विरुद्ध आढळराव पाटील यांच्यात लढत?

## शिवाजीराव आढळराव पाटील अजित पवारांसोबत?

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** शिरुरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचा पराभव करण्याचा पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बोलून दाखविताच काही महिन्यांपूर्वी अजित पवार यांच्यावर टीका करणारे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी त्यांचे कौतुक केले. दुसरीकडे माजी आमदार विलास लांडे यांनीही आपली तयार असल्याचे सांगितले. लांडे यांच्या तुलनेत आढळरावांची ताकद अधिक असल्याने पवार गट त्यांना पक्षात घेऊन उमेदवारी देईल अशी चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे शिरूरमध्ये पुन्हा डॉ. कोल्हे विरुद्ध आढळराव असा सामना होण्याची शक्यता आहे. शिरुरमध्ये २०१९ मध्ये ऐनवेळी डॉ. कोल्हे यांना पक्षात घेऊन उमेदवारी देण्यात आली.




कोल्हे यांनी तीनवेळा निवडून आलेल्या आढळराव पाटील यांचा पराभव केला. गेल्या पाच वर्षांत आढळराव पाटील हे अजित पवारांवर सातत्याने टीका करत आले आहेत. पवार हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या सरकारमध्ये सहभागी झाल्याने राष्ट्रवादीतील फुटीनंतर डॉ. कोल्हे यांनी शरद पवार यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला. आता अजित पवार यांनी डॉ. कोल्हेंचा पराभव करण्याचा निर्धार केला. मात्र, उमेदवार कोण हे सांगणे त्यांनी खुबीने टाळले. महायुतीमध्ये शिरुरची जागा अजित पवार यांच्या गटाला सुटणार आहे. त्यामुळेच भाजपचे भोसरीचे आमदार महेश लांडगे हे शांत झाल्याचे चित्र आहे. शिंदे यांच्या शिवसेनेतील माजी खासदार आढळराव पाटील हे देखील अस्वस्थ आहेत. त्यांनी अजित पवार यांचे कौतुक करण्यास सुरुवात केली असून अजित पवार यांनी एखादी गोष्ट मनावर घेतली की ती ते करून दाखवतात असे सांगत कोल्हेंचा पराभव करण्याच्या भूमिकेला साथ दिली. सलग दोनवेळा भोसरीतून पराभव झालेले माजी आमदार विलास लांडे यांनी निवडणूक लढविण्यासाठी तयार असल्याचे सांगितले. मागीलवेळी तयारी केली असताना ऐनवेळी डॉ. कोल्हे यांना उमेदवारी मिळाल्यामुळे त्यांना माघार घ्यावी लागली होती. २००९ मध्ये त्यांचा शिरुरमधून पराभव झाला होता. सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी आजपर्यंत लोकसभा लढविण्याचे टाळले. आता प्रकृतीचे कारण असल्याने ते निवडणूक लढविण्याची शक्यता धूसर आहे. लांडे यांच्या तुलनेत सलग १५ वर्षे शिरुरचे प्रतिनिधित्व करणारे आढळराव यांचा मतदारसंघात चांगला संपर्क आहे. शिवसेनेला जागा सुटणार नसल्याने आढळराव हे पवार गटात येऊ शकतात. युतीमध्ये उमेदवार देवाण-घेवाण यापूर्वी झालेली आहे. आढळराव पाटील हे पूर्वी राष्ट्रवादीतच होते. त्यामुळे मागील पराभवाचे उट्टे काढण्यासाठी आणि राजकीय पुनर्वसनासाठी ते अजित पवार गटात सहभागी होऊ शकतात. पवार गटाकडून निवडणूक लढविण्याची त्यांची तयारी असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे शिरुरच्या मैदानात पुन्हा डॉ. कोल्हे विरुद्ध आढळराव असा सामना होऊ शकतो.

### शिरुरमध्ये पवार गटाची ताकद

» शिरुर लोकसभा मतदारसंघातील आंबेगावचे आमदार दिलीप वळसे, खेळ-आळंदीचे दिलीप मोहिते, हडपसरचे चेतन तुपे हे अजित पवार गटात, तर शिरुरचे अशोक पवार हे शरद पवार यांच्यासोबत असून जुन्नरचे अतुल बेनके यांनी अद्याप ठामपणे आपण कोणासोबत आहोत, हे सांगितले नाही. भोसरीचे महेश लांडगे भाजपचे आमदार आहेत. शिरुरमध्ये पुन्हा डॉ. कोल्हे विरुद्ध आढळराव असा सामना होण्याची शक्यता आहे. शिरुरमध्ये २०१९ मध्ये ऐनवेळी डॉ. कोल्हे यांना पक्षात घेऊन उमेदवारी देण्यात आली.

# नवीन वर्षात पुणे मेट्रोच्या प्रवासी सेवेचा विस्तार

## वनाझ ते रुबी हॉल या मार्गावरील फेऱ्यांची संख्या वाढविण्यात येणार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन महामेट्रोने नवीन वर्षात पुणे मेट्रोच्या प्रवासी सेवेचा विस्तार करण्याची घोषणा केली आहे. यामुळे पिंपरी- चिंचवड महापालिका ते जिल्हा न्यायालय आणि वनाझ ते रुबी हॉल या मार्गावरील फेऱ्यांची संख्या वाढविण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुणे मेट्रोच्या गरवारे स्थानक ते रुबी हॉल स्थानक आणि फुगेवाडी स्थानक ते जिल्हा न्यायालय स्थानक या मार्गाचे लोकार्पण होऊन या मार्गावर प्रवासी सेवेचा विस्तार झाला. पुणे मेट्रोच्या पहिल्या टप्प्यातील मार्गिका १ (पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते जिल्हा न्यायालय) आणि मार्गिका २ (वनाझ ते रुबी हॉल) मिळून एकूण २४ किमी मार्गावर प्रवासी सेवा सुरु झाली आहे. उर्वरित ९ किमी मार्गाचे काम पूर्णत्वाकडे आले असून लवकरच पुणे मेट्रोची पहिल्या टप्प्यातील संपूर्ण मार्गिका प्रवाश्यांसाठी खुली करण्यात येणार आहे. लोकांमधील पुणे मेट्रोचा प्रवासासाठी होणारा वाढता वापर आणि नवीन वर्षाच्या निमित्ताने पुणे मेट्रो प्रवासी सेवेचा विस्तार करीत आहे. पुणे मेट्रोची सेवा सकाळी ६ ते रात्री १० या वेळेत सुरु असते. यामध्ये सकाळी ६ ते सकाळी ८ या वेळेत मेट्रोच्या दर १५ मिनिटांच्या वारंवारतेनी मार्गिका १ व मार्गिका २ वर ९ फेऱ्या, सकाळी ८ ते ११ दर १० मिनिटांच्या वारंवारतेनी मार्गिका १ वर १७ तर मार्गिका २ वर १८ फेऱ्या, सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत दर १५ मिनिटांच्या वारंवारतेनी मेट्रो दर १० मिनिटांच्या वारंवारतेनी मार्गिका १ व मार्गिका २ वर १२ फेऱ्या, सकाळी ८ ते ११ दर ७.५ मिनिटांच्या वारंवारतेनी मार्गिका १ व मार्गिका २ वर २४ फेऱ्या, सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत दर १० मिनिटांच्या वारंवारतेनी मार्गिका १ वर ३२ व मार्गिका २ वर ३० फेऱ्या, दुपारी ४ ते रात्री ८ या वेळेत दर ७.५ मिनिटांच्या वारंवारतेनी मार्गिका १ व मार्गिका २ वर ३२ फेऱ्या आणि रात्री ८ ते रात्री १० या वेळेत दर १० मिनिटांच्या वारंवारतेनी मार्गिका १ व मार्गिका २ वर १३ फेऱ्या प्रत्येक स्थानकावरून उपलब्ध होणार आहे.